देशदूत
www.deshdoot.com
पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. एन.एस.के./ ५५/२०२४-२६ आर.एन.आय. नंबर : १८९१८/१९७०.
/deshdoot /deshdoot /deshdoot Daily Newsgram
नाशिक । शुक्रवार, दि. २५ जुलै २०२५

आजचे कार्यक्रम

* विश्वास ग्रुप व महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, शाखा जलालपूर, नाशिकतर्फे गझल मैफिलीचे आयोजन विश्वास हब, ठाकूर रेसिडेन्सी, विश्वास को-ऑप. बँकेसमोर, सावरकरनगर, गंगापूररोड, सायंकाळी ६ वाजता गझल सादरीकरण

* आरोग्यशाळा रुग्णालयात शल्यतंत्र विभागात हर्निया व हायड्रोसील विकारांसाठी शिबिर.

* अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद नाशिक शाखेच्या वतीने संध्याकाळी ६ वाजता विनोद राठोड लिखित-दिग्दर्शित दगडी पायऱ्यांवर या एकांकिकेचे अभिवाचन महाकवी कालिदास कलामंदिर नाट्य परिषद हॉल येथे होणार आहे.

भारताला १३३ धावांची आघाडी

चौथी कसोटी/दुसरा दिवस : इंग्लंड दोन बाद २२५

मँचेस्टर । वृत्तसंस्था

मँचेस्टर कसोटीच्या पहिल्या डावात इंग्लंडविरुद्ध भारतीय संघ ३५८ धावांवर ऑलआऊट झाला. गुरुवारी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी संघाने २६४/४ धावांवरून खेळ सुरू केला आणि कठीण फलंदाजीच्या परिस्थितीत त्यांचे शेवटचे सहा गडी ९४ धावांत तंबूत परतले. इंग्लंडने दुसऱ्या दिवशी दोन गडी गमावत ४६ षटकांत २२५ धावा केल्या असून १३३ धावांनी पिछाडीवर आहे.

ओल्ड ट्रॅफर्ड स्टेडियमवर दुखापतीनंतरही भारतीय यष्टीरक्षक ऋषभ पंत फलंदाजीसाठी आला. एवढेच नाही तर त्याने आपले अर्धशतकही पूर्ण केले. पंतला दुखापत झाली तेव्हा तो ३७ धावांवर खेळत होता. पंतने मँचेस्टर कसोटी सामन्यातील दुसऱ्या दिवसाच्या खेळात पायाला फॅक्चर असताना मैदानात उतरून उपयुक्त अर्धशतकी खेळी केली. पहिल्या दिवसाच्या खेळात ४८ चेंडूत ३७ धावांवर लंगडत मैदान सोडलेला पंत गंभीर दुखापतीनंतरही २४ तासांच्या आत पुन्हा मैदानात उतरला. जोफ्रा आर्चरने एका उत्तम चेंडूवर त्याला बोल्ड केले. पण त्याआधी बेन स्टोक्सच्या गोलंदाजीवर कडक चौकार मारत पंतने ६९ चेंडूत अर्धशतक पूर्ण केले. पंत व्यतिरिक्त शार्दूल ठाकूरने ४१ आणि रवींद्र जडेजाने २० धावा केल्या. बेन स्टोक्सने आठ वर्षांनंतर एका डावात पाच बळी, जोफ्रा आर्चरने तीन, ख्रिस वोक्स आणि लियाम डॉसन यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

मँचेस्टर कसोटी सामन्यातून कसोटीत पदार्पण करणाऱ्या अंशुल कंबोजने बेन डकेटच्या रूपात पहिली विकेट आपल्या खात्यात जमा केली. इंग्लंडच्या या सलामीवीराने पदार्पणाचा सामना खेळणाऱ्या अंशुल कंबोजला सुरुवातीला सेट होऊ दिले नव्हते. या गोष्टीचा बदला घेताना अंशुलने इंग्लिश बॅटस्मनला शतकाच्या उंबरठ्यावर असताना तंबूचा रस्ता दाखवला. बेन डकेट ९४ धावांवर माघारी फिरला. जॅक क्रॉली ८४ धावा करून बाद झाला.

लायन्स क्लबचा दीक्षांत सोहळा

नाशिक । लायन्स क्लब ऑफ नाशिक कॉर्पोरेटचा अकरावा दीक्षांत सोहळा नाशकात एका हॉटेलमध्ये पार पडला. प्रमुख पाहुणे म्हणून मालपाणी ग्रुपचे गिरीश मालपाणी उपस्थित होते.

नवीन सभासदांना राजूभाई व्यास यांनी शपथ दिली. अध्यक्ष लक्ष्मीकांत पारनेरकर, सेक्रेटरी नितीन जाधव आणि खजिनदार मनीष जाधव यांनी कार्यभार स्वीकारला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मावळते अध्यक्ष अजय सानप, सचिन शहा, उदय कोठावदे, विनय बिरारी यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन ॲड. नंदकिशोर लाहोटी आणि दीपाली बिरारी यांनी केले. यावेळी राजेश कोठावदे, प्रशांत कोतकर उपस्थित होते.

'एमआयटी'चा नवा विक्रम

नाशिक । प्रतिनिधी

उच्चशिक्षणात उद्योजकता समाविष्ट करण्याच्या उद्देशाने वाधवानी फाऊंडेशनकडून डॉ. विश्वनाथ कराड एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीसोबत भागीदारी करार करण्यात आला आहे.

या उपक्रमात एमआयटीच्या बारा शाळांमधील तीस विभागांमध्ये साडेसात हजारांहून अधिक द्वितीय वर्षाच्या पदवीपूर्व विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. पंधराशेहून अधिक विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाखालील उपक्रम तयार करण्याचे फाऊंडेशनचे ध्येय आहे.

एकाच दिवसात सर्वाधिक डिजिटल उपक्रम नोंदणीसाठी आशियामध्ये एक नवीन विक्रम प्रस्थापित करण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न आहे.

'लाईफ केअर'चे सर्वरोग निदान शिबिर

नाशिक । मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त लाईफ केअर हॉस्पिटल व वैद्यकीय आघाडी भाजप यांच्या वतीने सर्वरोग निदान आरोग्य सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.सोमवार (दि.२८)पर्यंत हा आरोग्य सप्ताह सुरू असेल. यामध्ये विविध आजारांवर महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्यमार्फत मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. माजी मंत्री डॉ. भारती पवार यांनी शिबिरास भेट दिली. संचालक डॉ. उमेश मराठे यांनी शिबिराबद्दल माहिती दिली.

भुजबळ नॉलेज सिटीत इंटर्नशिप कार्यशाळा

नाशिक । सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधारणा कार्यक्रम उपक्रमांतर्गत मेट भुजबल नॉलेज सिटी, इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग येथे 'इंटरर्नशिप संधी व ऑन-द-जॉब ट्रेनिंग' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा पार पडली.

मुख्य प्रशासक डॉ. शेफाली भुजबळ, प्रल्हाद धुमाळ, मकरंद सावरकर, तेजस लेंडे, सृष्टी सरोदे, प्राचार्य डॉ. विजयकुमार वाणी, आयटी विभागाच्या प्रमुख डॉ. नमिता काळे यांनी विद्यार्थ्यांना विविध विषयांचे मार्गदर्शन केले. उद्योगातील सध्याची गरज, मुलाखतीसाठी आवश्यक कौशल्य तसेच शिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यांना व्यावसायिकदृष्ट्या कसे सक्षम करावे यावर वक्त्यांनी विचार मांडले. कार्यक्रमाचे नियोजन व समन्वय प्रा. दत्ता शिंगटे यांनी केले. यावेळी नाशिक आणि परिसरातील नव्वदहून अधिक कंपन्यांनी नोंदणी केली असून, सत्तर उद्योग प्रतिनिधी प्रत्यक्ष उपस्थित होते.

भारत आणि ब्रिटनमध्ये मुक्त व्यापार करार

(पान १ वरून) होतीत, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. तसेच मुक्त व्यापार कराराच्या माध्यमातून भारत आणि ब्रिटनमधील द्विपक्षीय व्यापार २०३० पर्यंत १२० अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत नेण्याचा दोन्ही देशांचा प्रयत्न असेल. भारत आणि इंग्लंडमध्ये झालेल्या मुक्त व्यापार करारामधील तरतुदींनुसार भारताला आपल्या ९९ टक्के निर्यात उत्पादनांना इंग्लंडमध्ये करमुक्त निर्यात करता येणार आहे. तर ब्रिटनमधून भारतात येणाऱ्या ९० टक्के उत्पादनांवर वाजवी टॅरिफ लावण्यात येईल किंवा त्यावरील टॅरिफ हटवण्यात येईल. त्यामुळे भारतीय कंपन्यांसोबतच सर्वसामान्यांनाही मोठ्या प्रमाणावर फायदा होणार आहे.

भाषावाद खपवून घेणार नाही : फडणवीस

(पान १ वरून) उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा झाला. श्री छत्रपती शिवाजी महाराज सामरिक आणि संरक्षण विशेष अध्यासन केंद्राचा कोनशिला समारंभ आणि कुसुमाग्रज मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती विशेष अध्यासन केंद्राचे उद्घाटन झाले.

यावेळी फडणवीस म्हणाले, देशातील अतिप्राचीन भाषांपैकी एक भाषा मराठी आहे, याचे अनेक पुराव सापडले आहेत. त्यामुळेच पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आपली मागणी स्वीकारली असून मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिला. मराठी ही अगोदरच अभिजात होती, पण त्याला आता राजाश्रय मिळाला आहे. आपल्या सर्वांसाठी ही अभिमानाची बाब आहे. मराठी भाषेने देशाला समृद्ध केले आहे, आपली नाट्यसृष्टी हे सर्वोत्तम आहे. देशामध्ये थिएटर जर कोणत्या भाषेने टिकवले आणि समृद्ध केले असेल तर ती मराठी आहे. म्हणूनच या भाषेवर अध्यसन आणि संशोधन झाले पाहिजे म्हणून हे अध्यासन केंद्र इथे झाले. भाषेवरून राजकारण आणि वाद निर्माण करणाऱ्यांना इशारा देताना फडणवीस म्हणाले की, मातृभाषेचा अभिमान असलाच पाहिजे, त्यासोबतच इतर भारतीय भाषांचा अभिमान आपण बाळगला पाहिजे. कारण आम्ही इंग्रजीचा पुरस्कार करतो, इंग्रजीला पायघड्या घालतो आणि भारतीय भाषांना विरोध करतो, याचे कुठतरी दुःख होते. आपला वाद मराठी आणि हिंदी नाही. पण मराठीसोबत इतर भारतीय भाषाही स्वीकारल्या पाहिजे. महाराष्ट्रात मराठी भाषेचा आग्रह होणे स्वाभाविक आहे, ते चुकीचे नाही. मात्र, भाषेवरून वाद होणे, कुणाला मारहाण करणे कदापि सहन केले जाणार नाही. याअगोदरही आम्ही कारवाई केली असून यापुढेही कोणी तसा प्रयत्न केल्यास कारवाई केली जाईल.

विज्ञान कथादिन

नाशिक । प्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ आणि विज्ञान कथा लेखक प्रा. जयंत नारळीकर यांच्या जन्मदिवसानिमित्त नुकताच 'राष्ट्रीय विज्ञान कथादिन' नाशिकमधील विविध शाळा आणि महाविद्यालयांमध्ये साजरा करण्यात आला. नाशिक

एज्युकेशन सोसायटी, मॉडर्न एज्युकेशन सोसायटी, नूतन मराठी प्राथमिक शाळा आणि मविप्र अध्यापक विद्यालयात विविध उपक्रम राबवण्यात आले. यामध्ये विज्ञान कथा वाचन, नाटुकल्या, शास्त्रज्ञांच्या जीवनचरित्रांचे सादरीकरण, विज्ञान गीत आणि विज्ञानावर आधारित कथा सादरीकरण यांचा समावेश होता.

विवाहितेची दोन मुलांसह विहिरीत आत्महत्या

(पान १ वरून) सौंदाणे शिवारात शेत वस्तीत असलेल्या विहिरीत या तिघांचे मृतदेह आज सकाळी आढळून आले. घरालगतच असलेल्या या विहिरीत हर्षालीने मुला-मुलीसह उडी घेतल्याने पाण्यात बुडून तिघे मृत झाले. या घटनेची माहिती मिळताच तालुका पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तिघांचे मृतदेह बाहेर काढले. दरम्यान, हर्षालीचे माहेर असलेल्या धुळे तालुक्यातील धाडरे येथील आई ठकूबाई, वडील धर्मा देवरे व कुटुंबियांना या घटनेची माहिती मिळताच त्यांनी सौंदाणे येथे घटनास्थळी धाव घेतली. आपल्या मुलीने आत्महत्या केली नसून पतीसह सासरच्या लोकांनी तिचा छळ केल्याने ही हत्याच असल्याने दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली.वडील धर्मा देवरे यांनी हर्षालीने माहेरहून पैसे आणावेत अशी मागणी करत तिचा सासरची मंडळी छळ करत असल्याचा आरोप केला. पूर्वी छळ होत असल्याच्या कारणावरून धुळे येथील महिला समुपदेशन केंद्रात दोघात समझोता झाल्याने मुलगी सासरी नांदत होती.

पीओपी मूर्ती विसर्जनाचा तिढा सुटला

(पान १ वरून) नैसर्गिक जलसाठ्यांमध्ये पीओपी मूर्तींचे विसर्जन करण्याविरुद्ध उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल झाली होती. याचवेळी नैसर्गिक जलसाठ्यांमध्ये पीओपींच्या मूर्तींचे विसर्जन करण्यास बंदी घालणाऱ्या केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (सीपीसीबी) मार्गदर्शक तत्त्वांना आव्हान देत गणपती मूर्तिकारांच्या संघटनांनी उच्च न्यायालयात दाद मागितली होती.

गुन्हा कबूल नाही : राहुल गांधी

(पान १ वरून) हिंगोली जिल्ह्यात झालेल्या तत्कालीन जाहीर सभेत राहुल गांधी यांनी सावरकर यांच्याविषयी आक्षेपार्ह विधान केले होते. त्यावरून २०२२ मध्ये निर्भय फाऊंडेशनचे अध्यक्ष देवेंद्र भुतडा यांनी नाशिक जिल्हा व सत्र न्यायालयात राहुल गांधी यांच्याविरुद्ध याचिका दाखल केली होती. न्यायालयात वेळोवेळी सुनावणी होत असताना ऑक्टोबर २०२४ पासून राहुल गांधी न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहत नसल्याने त्यांना वेळोवेळी समन्स बजावण्यात आले होते. त्यानुसार गेल्या १ मार्च रोजीच्या सुनावणीत राहुल गांधी न्यायालयात हजर राहणे अपेक्षित होते. मात्र, तेव्हा ते गैरहजर राहिले. त्यातच त्यांच्या वकिलांनी अर्ज दाखल केला नसल्याने याचिकाकर्ते भुतडा यांचे वकील मनोज पिंगळे यांनी न्यायालयासमोर युक्तिवाद करून राहुल गांधी यांच्या गैरहजेरीवर प्रश्न उपस्थित केले होते. त्यानंतर न्यायालयाने गांधी यांना प्रत्यक्ष किंवा ऑनलाईन पद्धतीने हजर राहण्याचे आदेश दिले होते. गुरुवारी (दि.२४) दुपारी चार वाजेच्या सुमारास न्यायाधीश रूपाली नरवाडिया यांच्याकडे सुनावणी झाली. दरम्यान, हा गुन्हा कबूल नसल्याचे राहुल यांनी म्हटले असून तशी नोंद न्यायालयाने करून ॲड. जायभावे यांची स्वाक्षरी नोंदवली आहे. आता त्यानुसार पुढील कार्यवाही होणार आहे.

स्थानिक भाव

सोने (प्रति १० ग्रॅम)	
२४ कॅरेट	१००,६००
२२ कॅरेट	९२,५५५
चांदी (प्रति किलो)	
११,६५००	

शेअर बाजार

सेन्सेक्स	८२,१८४
	(-५४२)
निफ्टी	२५,०६२
	(-१५८)

फळभाज्यांचे प्रती जाळी दर

	किमान	कमाल	सरासरी
टोमॅटो	३००	७००	५००
वांगी	२००	३००	२५०
फ्लॉवर	१००	२००	१५०
कोबी	९०	२००	१८०
ढोबळी	२५०	४००	३५०
कारले	३५०	५००	४५०
दोडका	२५०	४००	३५०
गिलके	२५०	४५०	४००
भेंडी	४००	५००	५५०
काकडी	३००	५००	४००

कालचे कांदा भाव

	आवक (क्विं.)	किमान	कमाल	सरासरी
लासलगाव	१११२८	५००	२१००	१४२५
विंचूर	१०११०	६००	१७८०	१४००
निफाड	२३४०	५०००	१४१०	१३११
सायखेडा	बंद	-	-	-
पिंपळगाव	७२००	८००	१९१७	१३००

भावपूर्ण श्रद्धांजली



कळविण्यात अत्यंत वाईट वाटते की,
मधुकर वामन दाणी
यांचे वयाच्या ८७ व्या वर्षी वृद्धपकाळाने दुःखद निधन झाले. त्यांना आमची
भावपूर्ण श्रद्धांजली!

: शोकाकूल :
मीरा मधुकर दाणी (पत्नी)
प्रमोद दाणी (मुलगा) वैशाली दाणी (सून)
सुनील दाणी (मुलगा) पद्मिनी दाणी (सून)
सतीश हिरे (जावई) माधवी हिरे (मुलगी)
नंदिनी दाणी (मुलगी) निशिगंधा पळघामोळ (नात)
रिपुजीता(नात) चिन्मय (नातू)
प्रतीक दाणी (नातू) साक्षी दाणी (नात)
व दाणी परिवार, नाशिक-नाशिकरोड

शब्दकोडे :३१०



आडवे शब्द : १) नदी. ४) संतापी. ६) अनाथ लोकांचे आश्रयस्थान. ९) केशवृद्धीची सुगंधी वनस्पती. १०) अंगातील कला सादर करणारा. १२) पाढे, पाढ्यांची उजळणी. १४) वंदन. १५) नकारार्थी उत्तर. १७) हाक, हाकेस उत्तर. १८) दहावी रास. २०) वाटणी, वितरण (हिं) २१) कापडाला घातलेली शिवण. २३) खेळाडूंमध्ये होणारा चुरशीचा खेळ. २५) मध, पुष्परस. २७) कपाळमड़ लावलेले कुंकू. २८) तलाव, सरोवर. २९) छिद्र. ३१) धोकादायक. ३५) जलद व चपळाईने वाकणे. ३७) प्रभात. ३८) पाढ्यातील तीन. ४०) बाण. ४२) श्रीकृष्णाचे एक नाव. ४३) वेळ वाया घालविणे. ४५) सडेतोड, स्पष्ट, खणखणीत. ४७) लेखणी. ४८) माराची तात्पुरती खूण. ४९) झरोका. ५२) पुष्पगुच्छ. ५३) कबूतर. ५४) निराळी. ५५) पाय. ५६) थंडीमुळे शरीराला येणारा कंप. ५९) लाकूड कापण्याचे हत्यार. ६१) पाणकोंबडा. ६३) वरपांगी. ६५) हिंदीत शपथ. ६६) नवरदेव. ६७) नक्षीदार ताट. ६९) जाणण्याची शक्ती. ७२) रममाण. ७३) शेळीचे पिल्लू. ७४) लोणी. ७५) बर्फाचा पर्वत.

उभे शब्द : १) सारखा. २) निरुद्योगी. ३) कुमारी, लहान मुलगी. ४) चांदणी. ५) गाडीचे छत. ६) दुर्दशा, अवकळा. ७) नर्तक (चेष्टेत). ८) श्रम करणारा. १०) काळी मैना नावाने ओळखले जाणारे बोर. ११) अरण्य. १३) पृथ्वी, वसुंधरा. १६) कंटाळवाणी बडबड. १८) मज्जाव. १९) धपाटा. २२) कावळ्यांचे ओरडणे. २४) पवन, वारा. २५) मत नोंदविण्याचा कागद. २६) वर्ण. २७ अ) नाहक, उगीच, अकारण. ३०) मनाचा ओढा. ३२) सैन्याला मालपुरवठा. ३३) वेदना, खटका. ३४) निर्लज्ज. ३६) मीठ. ३९) चिवचिवाट. ४१) वाळवंट. ४२) भीतीमुळे वाचा बंद होणे. ४४) नांगर. ४५) उत्सवाचे दिवस. ४६) च्या सह, च्या बरोबर. ४८) वरवरचे. ५०) बांबू. ५१) दणकट, भक्कम. ५२) चेंडू झेलला असता खेळाडू बाद होण्याचा प्रकार. ५७) त्वरित, पटकन. ५८) टिंगल, चेष्टा. ६०) छाती. ६२) धमकी, धाप. ६४) गणितातील उणे. ६६) वंशपरंपरागत चालत आलेली, (वृत्ती, जमीन इ.). ६८) बगळा. ७०) इंग्रजीत एक. ७१) मालक. ७२) दारूचा एक प्रकार.

शब्दकोड३०९चे उत्तर



देशदूत
हे दैनिक मुद्रक व प्रकाशक **राजेंद्र कृष्णराव सोनवणे** यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि. यांच्याकरिता प्लॉट क्र. बी ६४, नाईस, सातपूर, नाशिक - ४२२००७ येथे मुद्रित करून देशदूत कार्यालय, काँग्रेस हाऊस, म.गांधी रोड, नाशिक येथे प्रसिद्ध केले.
● संपादक : **हेमंत दिनेश अलोने.** ● सल्लागार संपादक : * **शैलेंद्र माणिकराव तनपुरे** (* पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) ✆ : शहर- ०२५३-२५७५७१६, २५७२४०० ● नाशिकरोड कार्यालय :०२५३-२९४२२०३
● मालेगाव कार्यालय फोन: ०२५५४-२९९२०३ ● सिन्नर फोन: ०२५५१-२९९२०३, ● दिंडोरी फोन : ०२५५७-२२२८८८ ● निफाड फोन : ०२५५७-२९९६९६. ● Mail id : ceditor@deshdoot.com